क्रमांक : ८३४५ / क-१,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई,
दिनांक : २ जून, २०२०.

: : <u>परिपत्रक</u> : :

महाराष्ट्र विधीमंडळाचे आगामी अधिवेशन दिनांक २२ जून, २०२० रोजीपासून विधान भवन, मुंबई येथे सुरू होणार आहे. विधीमंडळाच्या अधिवेशनाच्या अनुषंगाने बहुतांश कक्षातील कामकाज सुरू झालेले आहे. महाराष्ट्र राज्यातील कोरोना विषाणूचा प्रसार रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाय म्हणून लॉकडाऊन जाहीर करण्यात आलेला आहे. लॉकडाऊनच्या कालावधीमध्ये शासनाच्या निकषानुसार अधिकारी / कर्मचारी यांची कार्यालयामध्ये उपस्थिती निश्चित करण्यात आलेली आहे. तथापि, लॉकडाऊनच्या (टाळेबंदी) कालावधीपासून बरेचसे अधिकारी / कर्मचारी कार्यालयाच्या अनुमतीशिवाय गैरहजर असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे कार्यालयीन कामकाजावर विपरीत परिणाम होत आहे.

आगामी अधिवेशनाच्या अनुषंगाने सुरू झालेले कामकाज पाहता लॉकडाऊनच्या कालावधीत अद्यापपर्यंत कार्यालयात रुजू न झालेल्या अधिकारी / कर्मचारी यांनी (अधिकृतरीत्या मान्य करुन घेतलेल्या रजा यांच्या व्यतिरिक्त) उशिरात उशिरा सोमवार, दिनांक ८ जून, २०२० रोजी कार्यालयात उपस्थित राहून आपल्या उपस्थितीचा रुजू अहवाल कार्यालयास सादर करावा.

(ऋतुराज ज. कुडतरकर)
उप सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

प्रति,

१) मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद व मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव.
२) मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.
३) मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद/विधानसभा यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.
४) सचिव (कार्यभार), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय.
५) या सचिवालयातील सर्व अधिकारी व कर्मचारी.
६) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व कक्ष.
७) संगणक कक्ष (संकेतस्थळावर अपलोड करण्याकरिता)
८) निवडसूची.